दिनांक: २० एप्रिल,२०२३

प्रति,

मा.प्राचार्य,

यशवंत महाविद्यालय,

नांदेड.

विषय: 'शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज' समितीचा **वार्षिक अहवाल** स्वीकारणे बाबत.

संदर्भ : आपला दिनांक ०१ एप्रिल,२०२३ रोजीचा ई-मेल

आदरणीय महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार कळविण्यात येते, की शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी 'कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज' या समितीच्या नियोजनाच्या जबाबदारी माझ्याकडे होती.या समितीने प्रस्तुत शैक्षणिक वर्षात घेतलेल्या कार्यक्रमांचा **वार्षिक अहवाल** आपणाकडे जमा करतो आहे.

तरी मेहरबान साहेबांनी हा अहवाल स्वीकारून सहकार्य करावे, ही विनंती!

सोबत:

१) 'शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज'चा समितीचा **वार्षिक अहवाल**

आपला,

डॉ.विश्वाधार देशमुख,<br>
समन्वयक,<br>
कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज

**‘कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज’**
**२०२२-२३ : वार्षिक अहवाल**

२०१९-२० हे वर्ष माजी केंद्रीय गृहमंत्री,महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि आपल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रद्धेय डॉ.शंकरराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे शैक्षणिक प्रबोधन व्हावे या हेतूने ‘शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज’ ही समिती तयार करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ आणि **२०२१-२२** मध्ये दूरदृश्य प्रणालीचा कल्पक उपयोग करून विविध व्याख्याने घेण्यात आली होती.

परंतु २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात मात्र ‘कोव्हिड-१९’ चा संसर्ग बऱ्यापैकी ओसरल्याने **२०२२-२३** या शैक्षणिक वर्षातील बहुतांशी उपक्रम हे ‘आभासी पद्धती’ (Online Mode) आणि प्रत्यक्ष अशा Blended Mode मध्ये घेण्यात आले. **‘शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज’**देखील याला अपवाद राहिली नाही. समितीनेही या वर्षातील व्याख्याने प्रत्यक्ष स्वरुपात घेतली तर नियोजनाच्या कांही बैठकांसाठी **‘दूरदृश्य प्रणाली’**चा वापर केला.

**व्याख्यानमालेची रूपरेषा ठरविण्यासाठी बैठक :**

२०२२-२३ हे शैक्षणिक वर्ष हे जसे महाविद्यालयाचे हीरक महोत्सवी वर्ष आहे तसेच ते हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष देखील आहे. हे लक्षात घेऊन २२ ऑगस्ट २०२२ रोजी समितीची पहिली बैठक घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयाचे हीरक महोत्सवी वर्ष आणि हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष या दोन्हींवर भर देणारी व्याख्याने आयोजित करण्याचा निर्णय समितीने घेतला. तसेच विद्यार्थ्यांना नवनवीन क्षेत्रांचा परिचय करून देणारेही कांही कार्यक्रम घेण्याचे ठरविण्यात आले.

या बैठकीला डॉ.पद्माराणी राव, डॉ.एस.एम.दुर्राणी, डॉ.अजय गव्हाणे, डॉ.संजय जगताप आणि डॉ.संदीप पाईकराव हे सदस्य उपस्थित होते.

समितीने ठरविलेल्या नियोजनानुसार प्रस्तुत शैक्षणिक वर्षात घेतलेल्या विद्वत व्याख्यानांच्या **‘वार्षिक अहवाला’**चा हा गोषवारा:

कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज मध्ये सप्टेंबर २०२२ ते एप्रिल २०२३ या कालावधीत ‘विविध विषयांवर’ चर्चा घडवून आणणारी पाच विद्वत व्याख्याने घेण्याचे नियोजन केले होते. पैकी तीन विद्वत व्याख्याने घेण्यात आली.

**नव माध्यमांची चर्चा करणारे व्याख्यान:**

(०६ सप्टेंबर, २०२२)

माध्यमे ही समाजाचा आरसा असतात,असे मानले जाते. पण माध्यमांना केवळ समाज जसा आहे तसा दाखवून जमत नाही तर समाजाने कसे असायला हवे याचे दिग्दर्शनही करावे लागते. हे लक्षात घेऊन समितीच्या वतीने 'माध्यमे : काल, आज आणि उद्या' या विषयावर विद्वत व्याख्यानाचे आयोजन केले.

एबीपी माझाचे अभ्यासक पत्रकार श्री नवनाथ बन यांचे हे व्याख्यान चर्चित ठरले. त्यांच्या मांडणीचा सारांश खालीलप्रमाणे :

'आज माध्यमांवर मुठभरांची मक्तेदारी राहिलेली नसून आज प्रत्येकजण पत्रकार झालेला आहे. फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटरमुळे मोबाईल हे सशक्त माध्यम बनलेले आहे. माध्यमांवर नियंत्रक नसावेत; तर प्रबंधक असावेत. माध्यमे वास्तवाचे दर्शन घडविणारी भविष्याचे दिग्दर्शन करणारी असावीत. सशक्त दर्शक निर्माण करणे हे एक आव्हान असून आपण इतरांना डोळे देऊ शकतो; पण दृष्टी नाही,' असे प्रतिपादन 'एबीपी माझा' (मुंबई)चे निर्माते श्री.नवनाथ बन यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त कै.डॉ.शंकररावजी चव्हाण लेक्चर सिरीज व व्यक्तिमत्व विकास समितीतर्फे 'माध्यमे : काल,आज आणि उद्या' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.


याप्रसंगी विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री व संस्थेचे सचिव श्री.डी.पी.सावंत, कोषाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ.रावसाहेब शेंदारकर, कार्यकारणी सदस्य श्री. नरेंद्र चव्हाण,प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे,'एबीपी माझा'चे नांदेडचे प्रतिनिधी धनंजय सोळुंके, संदीप पाटील व डॉ.विश्वाधार देशमुख यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात श्री.डी.पी. सावंत म्हणाले की, 'मीडिया आणि राजकारण्यांचे अतूट नाते असून ते एकमेकांपासून दूर राहू शकत नाहीत. शासन, शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकांना पूरक असतील तरच ज्ञानपीपासू विद्यार्थी निर्माण होऊ शकतो. बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण ' म्हणजेच समाजाचा आरसा हे ध्येय समोर ठेवून वर्तमानपत्र काढले; मात्र काही सन्माननीय अपवाद वगळता आजकालची माध्यमे अर्पण असलेली दिसून येतात. केवळ एका धर्मावर आधारित असलेले राष्ट्र प्रगती करू शकत नाही. सर्व धर्मांना सोबत घेऊन जाणारा आपला देश असल्यामुळेच आपण प्रगती करीत आहोत.'

प्रारंभी प्रास्ताविक डॉ.विश्वाधार देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन शितल दुधंबे,पाहुण्यांचा परिचय अतुल तिडके, स्वागतगीत श्रुती देशमुख आणि आभार निकिता गाडेकर यांनी मानले.

याप्रसंगी 'यशोदीप-आज़ादी का अमृत महोत्सव' वार्षिकांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रश्नोत्तर सत्रात आयुष माने,पंकज पवार, अभिषेक पवार,अतुल तिडके, साईनाथ महादवाड, अक्षता चिंचोले, पल्लवी भार्गव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.विश्वाधार देशमुख,डॉ.एल. व्ही.पद्मारानी राव,डॉ.अजय गव्हाणे, डॉ.संजय जगताप, डॉ.संदीप पाईकराव, डॉ.हरिश्चंद्र पतंगे,डॉ.शबाना दूर्रानी,डॉ.एच. एल. तमलूरकर, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील, कार्यालयीन अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, प्रशांत मुंगल आदींनी परिश्रम घेतले.या व्याख्यानास डॉ.शिवराज बोकडे,डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ.ज्योती मुंगल,डॉ.संध्या जाधव आणि बहुसंख्य विद्यार्थी- विद्यार्थिनींची उपस्थिती होती.








माध्यमे दिशादर्शक व दिग्दर्शन करणारी असावीत - नवनाथ बन

नांदेड दि.६ - आज माध्यमांवर मुठभरांची मक्तेदारी राहिलेली नसून आज प्रत्येकजण पत्रकार झालेला आहे. फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटरमुळे मोबाईल हे सशक्त माध्यम बनलेले आहे. माध्यमांवर नियंत्रक नसावेत; तर प्रबंधक असावेत. माध्यमे दिशादर्शक व दिग्दर्शन करणारी असावी. सशक्त दर्शक निर्माण करणे हे एक आव्हान असून आपण इतरांना डोळे देऊ शकतो; पण दृष्टी नाही, असे प्रतिपादन एबीपी माझा, मुंबईचे निर्माते नवनाथ बन यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त कै.डॉ. शंकररावजी चव्हाण लेक्चर सिरिज व व्यक्तिमत्व विकास समितीतर्फे माध्यमे :काल, आज आणि उद्या या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

याप्रसंगी विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री व संस्थेचे सचिव डी.पी.सावंत, कोषाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, कार्यकारणी सदस्य नरेंद्र चव्हाण, प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे, धनंजय सोळुंके, संदीप पाटील व डॉ.विश्वाधार देशमुख यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात डी.पी. सावंत म्हणाले की, मीडिया आणि राजकारण्यांचे अतूट नाते असून ते एकमेकांपासून दूर राहू शकत नाहीत. शासन, शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकांना पूरक असतील तरच ज्ञानपिपासू विद्यार्थी निर्माण होऊ शकतो. बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पण म्हणजेच समाजाचा आरसा हे ध्येय समोर ठेवून वर्तमानपत्र काढले; मात्र काही सन्माननीय अपवाद वगळता आजकालची माध्यमे अर्पण असलेली दिसून येतात. केवळ एका धर्मावर आधारित असलेले राष्ट्र प्रगती करू शकत नाही. सर्व धर्मांना सोबत घेऊन जाणारा आपला देश असल्यामुळेच आपण प्रगती करीत आहोत.

प्रारंभी प्रास्ताविक डॉ.विश्वाधार देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन शितल दुधंबे, प्रमुख अतिथींचा परिचय अतुल तिडके, स्वागत गीत श्रुती देशमुख आणि आभार निकिता गाडेकर यांनी मानले.

याप्रसंगी यशोदीप वार्षिकांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रश्नोत्तर सत्रात आयुष माने, पंकज पवार,अभिषेक पवार, अतुल तिडके, साईनाथ महादवाड, अक्षता चिंचोले, पल्लवी भार्गव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.विश्वाधार देशमुख, डॉ.एल.व्ही.पद्मारानी राव, डॉ.अजय गव्हाणे, डॉ.संजय जगताप, डॉ.संदीप पाईकराव, डॉ.हरिश्चंद्र पतंगे, डॉ. शबाना दुर्रानी, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील, कार्यालयीन अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, प्रशांत मुंगल आदींनी परिश्रम घेतले. व्याख्यानास डॉ.शिवराज बोकडे, डॉ.वीरभद्र स्वामी, डॉ.ज्योती मुंगल आणि बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

**हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे वेगळेपण सांगणारे व्याख्यान :**

(२२ सप्टेंबर,२०२२ )

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ हे एकीकडे महाविद्यालयाचे हीरक महोत्सवी वर्ष आहे. तर दुसरीकडे हे वर्ष हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्षही आहे.यानिमित्ताने वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून याचाच हे भाग म्हणून कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सीरिज व इतिहास विभागाच्या वतीने दिनांक २२ सप्टेंबर,२०२२ (गुरुवार) रोजी सकाळी ११:०० वाजता महाविद्यालयाच्या भाषा प्रयोगशाळा सभागृहात ज्येष्ठ पत्रकार श्री. निशिकांत भालेराव (नाशिक) यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे मोल कळावे या हेतूने आयोजित या व्याख्यानात श्री.भालेराव यांनी 'हैदराबाद मुक्तिसंग्राम समजून घेताना' या विषयावर इतिहासातील विविध प्रसंग,घटना, घडामोडी विविध प्रसंग यांची मार्मिक जोड देत प्रभावी मांडणी केली.

१९७९ पासून ते १९९४ पर्यंत दैनिक 'मराठवाडा' मधील वार्ताहरापासून ते सहसंपादक पदापर्यंत आणि पुढे दैनिक 'आपले महानगर'चे निवासी संपादक,दैनिक 'देशदूत'चे कार्यकारी संपादक, दैनिक 'ॲग्रोवन'चे पहिले संपादक, साप्ताहिक 'आधुनिक किसान'चे संपादक आणि सध्या 'कृषी जागरण' या मासिकाचे संपादक असा पत्रकारितेचा दीर्घ अनुभव असलेल्या निशिकांत भालेराव यांच्यासारख्या मान्यवर अभ्यासकाच्या व्याख्यानामुळे 'हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा' हा विषय विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावी पद्धतीने पोहोचता झाला.

संस्थेचे सचिव श्री.डी.पी. सावंत हे व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी नव्या पिढीला आपल्या संघर्षपूर्ण इतिहासाचे मर्म कळण्यासाठी अशी व्याख्याने आवश्यक असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ गणेशचंद्र शिंदे यांनी आपल्या शुभेच्छा पर मनोगतातून व्याख्यानमालेला शुभेच्छा देत असताना हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

लेक्चर सीरिजचे समन्वयक डॉ.विश्वाधार देशमुख यांनी प्रास्ताविकातून व्याख्यानाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली.इतिहास विभागाचे प्रमुख डॉ.शिवराज बोकडे यांनी सूत्रसंचालन केले, पंकज पवार या विद्यार्थ्याने पाहुण्यांचा परिचय करून दिला तर समिती सदस्य डॉ.अजय गव्हाणे यांनी आभार प्रदर्शन केले. या व्याख्यानासाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक श्रीकांत देशमुख, डॉ.बालाजी चिरडे यांच्यासह नांदेड शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.








पुण्यनगरी

हैदराबाद मुक्तिसंग्रामाची ठिणगी नांदेडमध्ये पडली–भालेराव

नांदेड / प्रतिनिधी

हैदराबाद मुक्तिसंग्रामात १०२ आंदोलक हुतात्मे झाले. १९३२ पासून सुरू झालेल्या या संग्रामामध्ये चार लाख लोकांचा प्रत्यक्ष सहभाग होता. २१ हजार आंदोलक भूमिगत होते. या धगधगत्या अग्निकुंडाचा प्रारंभ नांदेडपासून झाला. रंगराव पाटे नरखेडकर हे पहिले शहीद नांदेडचे आहेत. स्वामी रामानंद तीर्थ यांना हैदराबाद मुक्तिसंग्राम निधर्मी ठेवण्यात यश प्राप्त झाले. स्वामीजींच्या तीन स्वीय सहाय्यकांपैकी कै.डॉ. शंकररावजी चव्हाण यांना महत्त्वपूर्ण स्थान आणि जबाबदारी देण्यात आली होती, असे प्रतिपादन हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे अभ्यासक व नाशिक येथील पत्रकार निशिकांत अनंत भालेराव यांनी केले.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात कै.डॉ.शंकररावजी चव्हाण लेक्चर सिरीज व इतिहास विभागाच्या वतीने हैदराबाद मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'हैदराबाद मुक्तिसंग्राम समजून घेताना' या विषयावर दि.२२ सप्टेंबर रोजी आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

संस्थेचे सचिव डी.पी. सावंत हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. याप्रसंगी विचारमंचावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन. शिंदे, जेष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख, पीपल्स कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप डी.पी.सावंत यांनी केले. यावेळी व्याख्यानाचे आयोजक प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे यांनी मार्गदर्शन करताना अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर विविध उपक्रमांनी हा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडण्याचा संकल्प त्यांनी यावेळी जाहीर केला.प्रारंभी समन्वयक डॉ.विश्वाधार देशमुख यांनी प्रास्ताविक केले. इतिहास विभागप्रमुख डॉ.शिवराज बोकडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख अतिथींचा परिचय पवार यांनी केले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.अजय गव्हाणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.संगीता शिंदे (ढेंगळे), डॉ.शबाना दुर्राणी, डॉ.एल.व्ही.पदमाराणी राव, डॉ.संदीप पाईकराव, प्रा.मधुकर वाघ, डॉ.मिरा फड, डॉ.विजय भोसले, डॉ. राजकुमार सोनवणे,डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ.कविता सोनकांबळे, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील आदींनी सहकार्य केले. व्याख्यानास डॉ.बालाजी चिरडे, प्रा.स्वाती सोनाळे, प्रा.शितल सावंत आदी प्राध्यापकांसह विद्यार्थी विद्यार्थिनींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

Smart Nanded Edition
Sep 25, 2022 Page No. 3

**मराठवाड्याच्या समृद्ध परंपरेचा पुनर्शोध घेणारे व्याख्यान :**

(०३ एप्रिल, २०२३)

'जागतिकीकरणाच्या गतिमान काळात तंत्रज्ञानात झालेल्या क्रांतीमुळे अवघे जग आपल्या मुठीत आल्याचा भास आपणाला होतोय; परिणामी आपली नजर सातत्याने जगात घडणाऱ्या घडामोडींकडे रोखलेली असते. जगातील वेगवेगळ्या देशात, संस्कृतीत काय महत्त्वाचे आहे? याकडे आपले सतत लक्ष असते. खरेतर असे लक्ष असणे वाईट

नाही; परंतु जागतिक घडामोडींचा वेध घेत असताना आपल्या देशात,प्रदेशात, गावात किती महत्त्वाचा सांस्कृतिक ऐवज लपलेला आहे,याचे आपणाला भान नसते. म्हणूनच जग जिंकण्याच्या धडपडीत आपण आत्मभान हरवून बसतो. अशा 'न्यून'दृष्टीमुळेच जगाच्या तसेच अन्य प्रदेशांच्या तुलनेत मराठवाडा हा मागास असल्याचा शिक्का मारला जाऊन या प्रदेशातील समृद्ध नाट्यपरंपरेकडे कमालीचे दुर्लक्ष झाले होत आले आहे. म्हणूनच तरुण पिढीने जागतिकीकरणाने उपलब्ध करून दिलेल्या तांत्रिक संसाधनांचा उपयोग करून या समृद्ध परंपरेचे जतन करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा!' असे प्रतिपादन नव्या पिढीतील नाटकाचे महत्त्वाचे अभ्यासक डॉ.दुर्गेश रवंदे यांनी यशवंत महाविद्यालयातील कै.डॉ. शंकररावजी चव्हाण लेक्चर सीरीजमधील समारोपाच्या व्याख्यानात केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेशचंद्र शिंदे हे होते.

डॉ. रवंदे पुढे म्हणाले की 'मराठी नाट्य परंपरा म्हटले की आपणाला पुणे,मुंबई,नाशिक अशी शहरे या परंपरेची निर्माती असतील असे वाटते, पण मराठी नाट्य परंपरेचे निर्माण शहरांनी नव्हे तर गाव खेड्यातील लोकपरंपरेने केले आहे. याचे ठळक उदाहरण म्हणून मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव, बीड जिल्ह्यातील चकलांबा,परभणी जिल्ह्यातील सेलू, सेलू जवळील चिखलठाणा (खुर्द) तसेच नांदेड जिल्ह्यातील कंधार अशा कितीतरी गावांनी सोंग, मेळे, दशावतार,लावणी अशा वैशिष्ट्यपूर्ण नाट्य प्रकारांच्या माध्यमातून या प्रदेशाची स्वतंत्र अशी नाट्यपरंपरा घडवली आहे.मात्र या परंपरेचे व्यवस्थित दस्तऐवजीकरण न झाल्याने तिला म्हणावी तशी प्रतिष्ठा मिळू शकलेली नाही.यासाठी आता तरुण पिढीतील अभ्यासकांनी पुढे येऊन आपल्या प्रदेशातील परंपरेला पुनर्वैभव प्राप्त करुन द्यायला हवे' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ गणेशचंद्र शिंदे यांनी 'विद्यार्थ्यांमध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची वृत्ती वाढीस लागावी म्हणून ही 'लेक्चर सीरीज' उत्तम व्यासपीठ असल्याचे सांगून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यायला हवा' असे आवाहन केले.

प्रास्ताविकात डॉ.विश्वाधार देशमुख यांनी लेक्चर सीरीजची भूमिका विशद केली. व्याख्यानाचे अतिशय ओघवते आणि सुरेख सूत्रसंचालन प्रगती तेलंग हीने तर आभारप्रदर्शन अतुल तिडके या विद्यार्थ्याने केले. जवळपास दीड तास रंगलेल्या या व्याख्यानासाठी डॉ.अजय गव्हाणे,डॉ.संजय जगताप,डॉ.संदीप पाईकराव हे समिती सदस्य तर डॉ.साईनाथ शाहू,डॉ.संध्या जाधव,डॉ.शिवाजी सुर्यवंशी, प्रा.अविनाश गायकवाड या प्राध्यापकांसह बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.









तरुण पिढीने मराठवाड्याची समृद्ध नाट्यपरंपरा जतन करावी

कै.डॉ.शंकरराव चव्हाण लेक्चर सीरीजमध्ये डॉ.दुर्गेश रवंदे यांचे प्रतिपादन

खरेतर कै.डॉ.शंकररावजी चव्हाण लेक्चर सिरीज मध्ये सर्वसाधारणपणे चार व्याख्याने घेण्याचे नियोजन होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे केवळ तीन व्याख्याने घेता आली. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये समितीने महाविद्यालयातील अन्य विभागांच्या समन्वयातून वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन केले. यातून विद्यार्थी अभिव्यक्त होण्याकडे वळू लागले आहेत.संवाद आणि लेखन कौशल्यांकडे त्यांचा ओढा वाढला आहे. आपण केवळ शिक्षण न घेता आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तत्पर असायला हवे,अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागली आहे. ही भावना वृद्धिंगत करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या भावनिक, मानसिक तसेच सांस्कृतिक विकासाकडे लक्ष देण्याचा प्रयत्न समितीने वरील कार्यक्रमांच्या आयोजनातून केला.

पुढील शैक्षणिक वर्षात समाजजीवनातील विविध पैलूंना उजाळा देणारे व्याख्याने आयोजित करण्याचा समितीचा मानस आहे.

डॉ.विश्वाधार रामराव देशमुख,

समन्वयक,

शंकरराव चव्हाण लेक्चर सिरीज